# राजकीय विचारधारा आणि सोशल मिडिया – सद्यस्थिती.

**डॉ. संजय गायकवाड**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे.

**प्रस्तावना -:**

भारतीय राजकारण आणि विचारधारा यांचे महत्त्व स्पष्ट करण्याआगोदर भारत राष्ट्राची जागतिक राजकारणामध्ये स्वतःची एक विचारधारा आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताने आपल्या विचारधारेचा प्रभाव पडलेला दिसून येतो. भारत हा देश उदारमतवादी, लोकशाहीची मुल्ये जपणारा म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, सत्य, अहिंसा, शांतीचा मार्ग अशा विचारांचे समर्थन करणारा आणि या विचाराच्या मार्गाने आपल्या राष्ट्राची वाटचाल करण्यास यशस्वी झाला आहे. भारतातील राजकीय पक्षाच्या विचारधारामध्ये सुद्धा या संकल्पनाचा समावेश दिसून येतो. भारतीय राजकारण आज एका वेगळ्या दिशेने जाताना दिसून येत आहे. भारतामध्ये तीस वर्षांनी एखाद्या पक्षास एवढे मोठे बहुमत मिळाल्याचे दिसून येते. कॉंग्रेस, भाजप, कम्युनिस्ट पक्ष, बहुजन समाज पार्टी, तृणमूल कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, दक्षिण भारतातील पक्ष अशा प्रत्येक पक्षाची विचारधारा दिसून येते त्या विचारधारावर आपल्या राजकारणाचा पाया रचताना प्रत्येक पक्ष आपल्याला दिसून येतो. राजकारणाचा अभ्यास करताना राजकारण आणि विचारधारा यामध्ये आज संघर्ष होताना आपल्याला दिसून येते. विचारधारेस काहीच महत्व राहिले नाही किंवा विचारसरणीचा अंत होत आहे अशी खंत वाटू लागते आणि अशा वेळी मात्र देशातील नागरिकांची जबाबदारी वाढते ती म्हणजे वैधानिक विचारधारेचे समर्थन करून राष्ट्रस योग्य अशा विचारांच्या मार्गाने पुढे घेऊन जाणे.

**भारतीय राजकारणाचे बदलते प्रवाह -:**

२०१४ च्या निवडणुकीनंतर भारतीय राजकारणात बदल झालेला आपल्याला दिसून येतो. निवडणुकीतील आधुनिक तंत्रपद्धती, सोशल मिडीयाचा वापर, प्रसारमाध्यमांचे वाढते प्रभाव, विचारधारा मधील कट्टरता या सर्व कारणावरून भारतीय राजकारणात बदल झालेला दिसून येतो. भारतीय राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक संघर्ष दिसून येतो आहे. विशिष्ट विचारधारेचे समर्थन करणाऱ्या संघटना प्रखरतेने आपल्या विचारधारेचा संघटीतपणे प्रसार करताना दिसून येत आहे. समूहद्वारे किंवा जमावाद्वारे हिंसा वाढण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक पक्ष विविध विचार्धारचा अर्थ आपल्या सोयीनुसार काढत आहे. तसेच त्याचा फायदा आपल्या पक्षास कसा होईल याकडे लक्ष देत आहे. सत्तेस अधिक महत्व प्राप्त झाल्याने विचारधारा संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय राजकारणात राजकीय संघर्ष मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. राजकारणाचा हेतू समाजकारण असते समाजकारणाचे उद्देश यशस्वी होण्यासाठी विचारधारा महत्त्वाची असते. वैधानिक व सर्वसमावेशक विचारधारेमधूनच राजकीय व सामाजिक उद्देश यशस्वी होत असते. २१व्या शतकात भारतात धर्मांधता, जातीयता, जमातवाद आणि द्वेष पसरवणारी संघटीत विचारधारा व राजकारण वाढत आहे. परिणामी हिंसा वाढताना दिसून येत आहे.

**राजकारणातील वैचारिक संघर्ष -:**

सद्यस्थितीत भारतीय राजकारणात वैचारिक संघर्ष मोठ्या प्रमाणात होतना दिसून येत आहे. लोकशाही व्यवस्था असलेल्या राष्ट्रामध्ये विचारांची लढाई ही विचारांनीच लढली जावी. राजकीय विचारामध्ये जी नैतिकता असावी लागते ती दिसून येत नाही. आदर्शवादी लोकशाही विचारानां नेहमीच बाजूला केले जाते. सत्ताकारणास महत्व प्राप्त झालेले दिसून येते. विचारामधील संघर्ष हा इतिहासामध्ये सुद्धा झालेला दिसून येतो. परंतु वैचारिक संघर्षाचा अभ्यास करताना असे दिसून येते कि या संघर्षा मध्ये विचारधारा

कोणतीही असली तरी आपली विचारधारा मांडण्याचे मार्ग मात्र दोनच दिसून येतात. एक शांततेच्या मार्गाने वैधानिक पद्धतीने आणि दुसरे प्रखरतेने अवैधानिक पद्धतीने विचार मांडणारे असे दोनच पक्ष दिसतात. त्यामुळे विचारांमधील संघर्ष वाढताना दिसतो. विचारांमध्ये कट्टरता ज्या वेळेस निर्माण होते त्यावेळेस ती व्यक्ती विचारांमधील बदल स्वीकारण्यास तयार होत नाही किंवा बदलत्या परिस्थितीचा समावेश आपल्या विचारांमध्ये करत नाही. यातूनच राजकारणातील वैचारिक संघर्ष होताना दिसते. जगातील विचारांचा संघर्ष पाहिल्यास असे दिसून येते कि धर्म, वंश, वर्ग अशा कारणावरून संघर्ष झालेला दिसून येतो. भारतीय राजकारणामध्ये वैचारिक संघर्ष तर मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. धर्माच्या आधारावर राजकारण आज मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. धार्मिक संघर्षास राजकारणाची जोड मिळाल्यास प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या पद्धतीने राजकारण करताना दिसून येते. परंतु या संघर्षामध्ये बळी पडते ती सामान्य जनता. आजच्या व्यवहारिक जीवनामध्ये व्यक्तीला दैनंदिन गरजांची पूर्तता करणे कठीण झाले आहे. अशा संघर्षामुळे समाजाची नेहमीच अधोगती होते.

**सत्ता स्थापन व राजकीय विचारधारा -:**

राजकारणाचे प्राथमिक सूत्र हे सत्ता मिळविणे असे असते. सत्ता मिळविणे हे प्रत्येक पक्षाचे उद्दिष्ट असते. पक्षीय राजकारणास वास्तवतेची जोड दिल्यास सत्ता मिळविणे आणि मिळालेल्या सत्तेतून पक्ष वाढविणे आणि त्यातून समाजकारण करणे असे प्रत्येक पक्ष करताना दिसून येते. राजकीय पक्षाची स्थापना ज्यावेळेस होते त्यावेळी एका विचारांनी किंवा त्या विचाराचा पुरस्कार करणारी व्यक्ती एकत्र येतात. समान उद्दीष्ये समान ध्येये समान विचारधारा या आधारावर व्यक्ती एकत्र येऊन एका विशिष्ट विचारधारेच्या आधारे राजकीय पक्षाची स्थापना करतात. भारतीय राजकारणामध्ये विविध विचारधारेचे समर्थन करणारे पक्ष आहेत. त्या प्रत्येक पक्षाची स्वतंत्र विचारधारा दिसून येते. त्यातून प्रत्येक पक्ष आपली विचारधारा कशी श्रेष्ठ आहे आणि देशाच्या विकास साधण्यास आपली विचारधारा कशी पूरक आहे याचा प्रचार करत असते. परंतु १९९० साला पासून भारतीय राजकारणामध्ये आघाडीची सरकारे स्थापन झालेली आपल्याला दिसून येतात. ज्यामध्ये विविध विचारधारा असणारे पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापन केल्याची उदाहरणे दिसून येतात. परंतु ज्यावेळेस भिन्न विचारधारेचे पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापन करतात त्यावेळेस मात्र सत्तेसाठी विचारधारेला बाजूला सारले जाते. मागील काही कालावधीतील राजकारण पाहिल्यास सत्तेसाठी विचारधारेचा त्याग केला जातो आणि सत्ता नसताना मात्र विचारधारेचा आधार घेतला जातो. आजकाल राजकारणामध्ये सर्व काही सोयीसाठी केले जाते. त्यामुळे राजकारणात पक्षाची यशस्वीता त्याची पक्षीय संघटना विचारधारा या मुख्य घटकांवर आधरित असते.

**राजकारण आणि सोशल मिडिया -:**

राजकीय पक्षाची गरज, तंत्रज्ञानात्मक संघटना बांधणी, धोरणातले बदल राजकारणातील लोकांना नेत्यांना थेट लोकांपर्यंत अर्थात मतदारापर्यंत पोहचण्याचा सोपा मार्ग म्हणजे सोशल मिडिया. त्यामुळे सोशल मिडिया राजकारणाचा मुख्य गाभा बनलेला आहे. राजकारणी सोशल मिडीयाचा वापर निवडणूक कालावधीमध्ये चांगल्याप्रकारे करून घेत आहे. एक प्रभावी माध्यम म्हणून राजकीय नेते सध्या सोशल मिडियाकडे पाहू लागले आहे. राजकारण परिवर्तनशील असते तसेच माध्यमेदेखील सतत बदलत असतात. फार पूर्वी आपल्याकडे वर्तमानपत्रे आणि रेडीओ हि संवादाची माध्यमे होती. त्यानंतर न्यूजमाध्यमे यामध्ये आल्याचे आपल्याला दिसून येते. आणि नंतर सोशल मिडिया. अर्थात असे असले तरी आजही वर्तमानपत्राचे किंवा न्यूज माध्यमाचे महत्व कमी झाले नाही. आज भारतीय राजकारणावर फार मोठ्या प्रमाणात सोशल मिडियाचा प्रभाव दिसून येतो. प्रामुख्याने २०१४ ची निवडणूक आणि त्यानंतर झालेल्या राज्याच्या निवडणुकीत सोशल मिडीयाचा वापर झालेला दिसून येतो. जागतिक क्षेत्रात हि सोशल मिडियाचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. भारतामध्ये निवडणूक तंत्र म्हणून आज या घटकाचा अभ्यास करण्यात येत आहे. तसेच पक्षातील संघटना बांधणी करण्यासाठी आणि जनतेपर्यंत पक्षाची धोरणे पोहचवण्यासाठी सोशल मिडीयाचा वापर केला जात आहे. राजकीय पक्षा व्यतरिक्त सामाजिक असणारे लोक समाजातील भयावह घटनांनी व्यतीत होऊन आपले म्हणणे सरकार पर्यंत पोहचण्यासाठी व समाजाप्रती आपली प्रत्येकाची जबाबदारी सांगण्यासाठी प्रतिक्रिया नोंदवीत असतात. सोशल मिडीयाचा आज

सामाजिक राजकीय शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात प्रभाव पडलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :-**

भारतीय राजकारण आणि घटकराज्य स्तरावरील राजकारणामध्ये विचारधारेस दुय्यम स्थान देण्यात येत आहे. सत्तेस अधिक महत्व प्राप्त झाल्याने विचारधारा बाजूला केली जात आहे आणि सत्तेस केंद्रबिंदू मानून सत्ता मिळविण्यासाठी राजकीय पक्ष कोणत्याही स्तराला जाताना आज दिसून येते आहे. राजकारणामध्ये राजकीय पक्ष हे विचारधारा आणि सत्ता या मध्ये सत्तेसाठी आपआपल्या सोयीनुसार विचारधारेचा वापर होताना दिसून येत आहे. लोकशाही देशांमध्ये अशा पद्धतीचे सत्ताधारित राजकारण हे त्या व्यवस्थेला धोकादायक असते. त्यामुळे ज्या विचारावर आधारित पक्षाची निर्मिती झाली आहे त्याच्या आधारे राजकारणाची दिशा सर्व राजकीय पक्षांनी करणे गरजेचे आहे. वैधानिक, शांतता, समता, लोकशाही, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्ष या विचारांची आज राजकारणामध्ये तसेच समाजकारणामध्ये गरज असल्याचे दिसून येते. लोकशाही चे जे चार स्तंभ आहेत त्यातील एका स्तंभाला अधिक बळ मिळाले तर संपूर्ण व्यवस्था कोलमडण्याची शक्यता असते. आज सोशल मिडियाचे राजकारणामध्ये प्रभाव अधिक वाढलेले आहे. मिडीयाने आपली जबाबदारी ओळखून लोकशाही मुल्यांवर आधारित आपली कार्ये करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**

१) डॉ. भोळे, भा.ल.,राजकीय सिद्धांत, पिंपळेपूरे प्रकाशन, नागपूर.
२) डॉ. निकुंभ,दिलीपसिंह,आधुनिक राजकीय विचार प्रणाली, प्रशांत प्रकाशन.
३) डॉ. पाटील,व.ब.,आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत प्रकाशन.
४) राजदीप सरदेसाई, (अनुवाद: निखील वागळे), २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन, मुंबई.
५) कविता सोनकांबळे, मिडिया आणि राजकारण, निर्मल प्रकाशन.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com